**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक — १५९१/२०२२/अहमदनगर**

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख गुलाब रसुलभाई<br>रा. बोल्हेगांव फाटा, मनोलिला नगर, प्लॉट नं. २१,<br>एम. आय. डी. सी. नागापुर, अहमदनगर,<br>ता.जि. अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा,<br>विस्तार अधिकारी (शिक्षण),<br>पंचायत समिती कार्यालय, नेवासा,<br>ता. नेवासा, जि. अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>गट शिक्षण अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, नेवासा,<br>ता. नेवासा, जि. अहमदनगर. | : | प्रतिवादी |

**सुनावणी दिनांक — २२/०६/२०२२**

अपिलार्थी यांनी दि. ०१/०६/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.२२/०६/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** विद्यमान/तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे प्रतिनिधी व इतर सर्व पक्षकार उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दि. २३/११/२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये सेवा निवृत्त प्रा. शिक्षिका तथा केंद्र प्रमुख शिक्षण विभाग पं.स. नेवासा यांच्या पेन्शन मंजुरी आदेशाची पति-पत्नीचे फोटो लावलेल्या पहिल्या पानाची छायांकित प्रमाणित प्रत याबाबतची माहिती मिळण्याची विनंती केली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दिनांक १०/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्यामुळे सदर माहिती द्यावी किंवा कसे याबाबत संबंधितास कळविले असता संबंधिताने पती व माझे औरंगाबाद खंडपिठात भांडण चालू असून मी १३ वर्षापासुन विभक्त राहात आहे तरी माझ्या पेन्शन पेपर बाबतची माहिती कोणासही (पती/मुले यांना) देऊ नये असे इकडे कळविले आहे, त्यामुळे माहिती देता येत नाही असे कळविले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दि. २६/१२/२०२० च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दि.०५/०३/२०२१ रोजी, निर्णय पारित करतांना अपिलार्थी यांच्या पत्नी श्रीमती शेख नाजमा माशुम भाई यांना सदर माहिती अपिलार्थीस पुरविण्याबाबत विचारना केली असता

त्यांनी त्यांचे पती अथवा त्यांच्या मुलास माहिती देऊ नये असले लेखी दिले असल्याने व सदर माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असल्याने जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य ठरवून प्रथम अपिल निकाली काढले.

सुनावणीवेळी अपिलार्थी यांनी नमूद केले की, सदर माहिती ही त्यांच्या पत्नीची असल्याने वैयक्तीक स्वरुपाची माहिती मध्ये मोडत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी नमुद केले की, अपिलार्थी यांच्या पत्नीने सदर माहिती पुरविण्यास नकार दिला असल्याने माहिती पुरविता आली नाही. तसेच अपिलार्थी व त्यांच्या पत्नीचा वाद चालु असल्याने मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात खटला सुरू आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २३/११/२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे स्पष्ट होते. तसेच अपिलार्थी व त्यांच्या पत्नी यांचा मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात खटला चालु असल्याने सदर माहिती पुरविता येत नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही.

माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २ (ढ) नुसार "त्रयस्थ पक्ष" याचा अर्थ माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या नागरीका व्यतिरिक्त अन्य एखादी व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये, सार्वजनिक प्राधिकरणाचा समावेश होतो. त्याच प्रमाणे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८ (१) मध्ये जी माहिती पुरविणे आवश्यक नाही अशा बाबींचा उल्लेख करण्यात आला असुन त्यामधील (त्र) मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे. "जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याची, राज्य जन माहिती अधिकाऱ्याची किंवा अपील प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल, ती खेरीजकरुन, जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप करील, अशी वैयक्तीक तपशीलासंबंधातील माहिती."

माहिती अधिकार अधिनियमातील उपरोक्त तरतुदींचा विचार करता या प्रकरणातील अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाशी संबंधीत माहिती मागीतली असुन सदर त्रयस्थ पक्षाने मागणी केलेली माहिती उघड करण्यास नकार दिला आहे. तसेच सदर माहिती उघड करणे लोकहीताच्या दृष्टीने आवश्यक असल्याचे सिध्द करण्यास अपिलार्थी अपयशी ठरले आहेत, ही बाब विचारात घेता, अपिल निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १५९१/२०२२/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

**क्रमांक : रामाआ- नाशिक/द्वि.अ.क्र./१५९१/२०२२/अहमदनगर ओ-** ३३७४ **दिनांक-** 05/12/2022